**साथी संस्था, पुणे संचलित व**
**कर्वे समाज सेवा संस्था, पुणे, मान्यताप्राप्त**

# प्रमाणपत्र कोर्स

## आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या
कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**

## मोड्युल - ३

**लोकशाहीचे घटक व लोक सहभागातून**

## आरोग्यसेवांचे नियोजन
















- संकलन व लेखन
  **हेमराज पाटील**
  **विनोद शेंडे**

- मार्गदर्शन
  **डॉ. नितिन जाधव**

- मुखपृष्ठ
  **भाऊसाहेब आहेर**
  **गजानन लोंढे**

- मांडणी
  **शारदा महल्ले**

- **मार्च, २०१६**

- **प्रकाशक**

SATHI
Flat No. 3 & 4, Aman E Terrace, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411029
Ph. No. (020) 25472325, 7588032218
Website - www.sathicehat.org, Email - sathicehat@gmail.com

**आयोजक** — साथी

**मान्यता** — कर्वे समाज सेवा संस्था (ESTD. 1963)

**अर्थसाहाय्य** — कोपासा

# मोड्युल - ३

## लोकशाहीचे घटक व लोकसहभागातून

# आरोग्यसेवांचे नियोजन

सामाजिक सेवांच्या उत्तरदायित्वाविषयी स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या

कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन सखोल व व्यापक करण्यासाठी....

**दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रम कोर्स**


संकलन

**हेमराज पाटील**

**विनोद शेंडे**

मार्गदर्शन

**डॉ. नितिन जाधव**


साथी

# या कोर्सविषयी थोडक्यात...

भारतात गेल्या दशकभरात सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणा व जनतेमध्ये संवादाची प्रक्रिया घडविण्यासाठी, आरोग्य यंत्रणेचे जनतेप्रती उत्तरदायित्व व आरोग्यसेवांमधील पारदर्शकता वाढण्यासाठी विविध संस्था-संघटनांनी प्रयत्न केले आहेत. त्याची परिणिती म्हणूनच भारतात लोकाधारित देखरेखीचे विविध नमुने विकसित झाले आहेत. तुमच्या सारखे गावपातळीवर काम करणारे कार्यकर्ते विशेष करून लोकाधारित देखरेख राबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रात तरी लोकाधारित देखरेखीची संकल्पना रुजत आहे. आमच्या मते संकल्पनेचा विस्तार व्हायला हवा. त्यासाठी नवीन कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ही गरज लक्षात घेता हा कोर्स घेण्यात येत आहे.

हा अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र या विभागातील एकूण १२५ विद्यार्थी कार्यकर्त्यांचा समावेश असणार आहे. प्रत्येक विभागातून २५ विद्यार्थी कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

हा कोर्स 'साथी' संस्था'व सामाजिक कार्याचे पदव्युत्तर शिक्षण (MSW) देणाऱ्या 'कर्वे समाजसेवा संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या कोर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' (Community of Practitioners on Accountability and Social Action in Health) या आंतरराष्ट्रीय समूहाचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. हा कोर्स मुख्यत्वे दूरस्थ शिक्षण (distance-learning) प्रकारचा असून या कोर्सचा कालावधी एक वर्षाचा आहे. वर्षभरात दोन संपर्क सत्र आयोजित (contact session) केले जाणार असून पहिले संपर्क सत्र हे ३ दिवसांचे असेल तर दुसरे संपर्क सत्र हे एक दिवसाचे असेल. पहिल्या संपर्क सत्रात सहभागी प्रतिनिधींना प्रशिक्षण व कोर्ससंबंधी प्रशिक्षण साहित्य देण्यात येईल. तर दुसऱ्या संपर्क सत्रात परीक्षा व विद्यार्थी कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या उपक्रमांबद्दल चर्चा करण्यात येईल. विद्यार्थी कार्यकर्त्यांनी पहिल्या संपर्क सत्रानंतर आपल्या कार्यक्षेत्रात मार्गदर्शक पुस्तकात दिल्याप्रमाणे गतिविधी (Field Activity) करणे अपेक्षित आहे.

**या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्ये**

- विविध आरोग्यसेवा व सामाजिक सेवांवर उत्तदायित्व हे तत्त्व समजून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची व्यापक समज आणि दृष्टिकोन विकसित करणे.
- विविध सामाजिक संघटनांकडून धोरण वकिली/जनवकालत वापरण्यात येणाऱ्या विविध पद्धतींचा व रणनीतिबाबत दृष्टिकोन व समज वाढवणे.

# मार्गदर्शक पुस्तिका (मोड्युल) विषयी थोडक्यात...

भारतामध्ये लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार भारतीय राज्यघटनेद्वारे केला आहे. लोकशाही शासनपद्धतीमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. लोकशाही व्यवस्थेत लोकांच्या सहभागाने प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्व आणता येते. या संकल्पनेला घेऊनच लोकशाहीबाबत आपली समज व्यापक होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने या मोड्युलमध्ये मांडणी करण्यात आलेली आहे.

भारतातील लोकशाही ही प्रातिनिधिक लोकशाही असल्याने वरच्या स्तरावर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो. परंतु राज्यघटनेतील तरतुदीनुसार स्थानिक पातळीवर जनतेला प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी विविध मार्ग आहेत. या मोड्युलमध्ये आपण लोकशाही म्हणजे काय? व लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार समजून घेणार आहोत. तसेच प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीमध्ये लोकांना सहभागी होण्याचे वेगवेगळे मार्ग कोणते आहेत, त्यांची वैशिष्ट्ये व या मार्गांचा उपयोग कसा करता येईल, याबाबत सविस्तर मांडणी या मोड्युलमध्ये करण्यात आलेली आहे.

शासनाच्या कोणत्याही नियोजनात लोकांच्या सूचना समाविष्ट करण्यासाठी विविध पद्धतीचा वापर केला जातो त्यातील एक महत्त्वाची पद्धत म्हणजे 'लोकसहभागामधून ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास घेऊन स्थानिक पातळीवरील संसाधनांचे नियोजन.' लोकांच्या नेमक्या आरोग्य गरजा, आरोग्य समस्या शोधण्यासाठी स्थानिक परिस्थितीचा अभ्यास असणे गरजेचे आहे. त्याआधारेच आपण नियोजनासाठी सूचना देऊ शकतो. आजपर्यंत होत आलेल्या नियोजनात सूचना या वरूनच दिल्या जात होत्या. त्यामुळे स्थानिक पातळीवरच्या समस्यांवर आधारित नियोजन म्हणजे एक प्रकारचे मृगजळच होते.

कार्यकर्ता म्हणून आपल्याला आपल्या परिसरात आरोग्यसेवांची स्थिती कशी बळकट करता येऊ शकते, लोकसहभागी नियोजनात लोकसहभागाचे महत्त्व आणि भूमिका काय असाव्यात? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे, सूचनांचा शोध आपण मिळून घेण्याचा एक छोटासा प्रयत्न या मार्गदर्शिकेतून करत आहोत.

हे मोड्युल विकसित करण्यासाठी 'साथी' संस्थेच्या विविध प्रकाशनांची मदत झाली असून, 'कर्वे समाज सेवा' संस्था व आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यसेवांवर सामाजिक उत्तरदायित्व व कृतीसाठी काम करणाऱ्या 'कोपासा' या नेटवर्कच्या स्टेअरिंग कमिटीने या मोड्युलचे समीक्षण केले आहे.

# अनुक्रमणिका

**प्रकरण १-**

लोकशाहीची संकल्पना व प्रत्यक्ष लोकशाही............................५

**प्रकरण २-**

प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग घेण्यासाठीचे विविध मार्ग...........................................................१४

**प्रकरण ३-**

लोकसहभागाचे घटक व लोकाधारित नियोजनचे महत्त्व.........३४

**परिशिष्ट-**

आरोग्य ग्रामसभा शासन निर्णय .......................................५१